स.के.नं. ३३२/२०१७
नि. क्र. १२ लगत

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी
माझे नाव – सुनिल हरिश्चंद्र सुतार
वय वर्षे –५५, व्यवसाय – सुतारकाम
राहणार – वालोपे, देऊळवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एम.ए.दावत यांचेमार्फत सुरु.</u>**

दि.०८.०४.२०१७ रोजी सुतारकामानिमित्त आमडस येथे गेलो होतो. सुप्रिया माझी पत्नी आहे. त्यादिवशी ती घरी होती. दर्शन हा आमचा नातेवाईक आहे. तो मुंबईहून आमच्या घरी पाहूणे म्हणून राहण्यास आला होता. मौजे मुसाड येथील काशिराम सिताराम चांदे यांनी त्यांची नादुरुस्त एम–८० दुचाकी क्र.एमएच ०८ डी ८९७९ दुरुस्त करण्यासाठी मार्कंडी येथील गॅरेज मध्ये दिली होती. ती दुरुस्त झाल्यानंतर मी घरी आणून ठेवली. त्याची चावी मी घरात ठेवली होती. त्यानंतर मला असे समजले की दर्शनने घरात लावलेली सदर दुचाकी नेवून बेंडकरवाडी वालोपे येथील एस.टी स्टॉप येथे अपघात झाला आहे. अपघातादरम्यान त्याचा मृत्यु झाला आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.एन.मोहिते यांचे तर्फे सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मला व्यक्तीशः माहीती नाही. दर्शनचे वय अंदाजे १४–१५ वर्षे असेल. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण

दिनांक –२४/०९/२०२५
चिपळूण.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २४.०९.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २४.०९.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २४.०९.२०२५ |